दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३५१ वा • गुरुवार, ता. १० जुलै २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००




## ९ जुलै देशव्यापी संप : परभणीत कामगार-कर्मचाऱ्यांचे प्रचंड आंदोलन

**परभणी । प्रतिनिधी**

कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी देशव्यापी संपाला ९ जुलै रोजी जोरदार प्रतिसाद मिळाला. परभणी जिल्ह्यात आयटक व किसान सभेच्या वतीने परभणी, गंगाखेड, मानवत, पाथरी, सेलू व सोनपेठ येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार मोर्चे, धरणे व निदर्शने करण्यात आली. याबाबतची माहिती ॲड. माधुरी क्षीरसागर यांनी दिली. या आंदोलनात अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर्स, शालेय पोषण आहार कर्मचारी, रेशन गोदाम व रेल्वे गुड्समधील हमाल-माथाडी कामगार यांनी १००% सहभाग नोंदवला. आयटक संलग्न एमएससीबी वर्कर्स फेडरेशन, कंत्राटी बँक कर्मचारी, पोस्ट कर्मचारी, शिक्षकवर्ग यांचाही संपात सक्रीय सहभाग दिसून आला. केंद्र व राज्य सरकारच्या कामगार व कर्मचारी विरोधी धोरणाविरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. चार लेबर कोड रद्द करावेत, जनसुरक्षा विधेयक मागे घ्यावे, योजना कर्मचाऱ्यांना किमान वेतन द्यावे, कंत्राटीकरण व आऊटसोर्सिंग बंद करावी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांवरील एफआरएस सक्ती थांबवावी, नगरपरिषदेतील कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळावे, तसेच सर्व विभागातील कर्मचारी भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, या प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी मांडल्या. किसान सभेच्या वतीने देखील विविध मागण्यांसाठी ठिकठिकाणी निवेदने देण्यात आली. शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा, पिक विमा योजनेतील शेतकरी विरोधी बदल रद्द करावेत, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, शेतकऱ्यांना सौरपंप तात्काळ द्यावेत, हमीभावाचा कायदा करावा आणि २०२४ च्या थकीत पिक विम्याची रक्कम तात्काळ अदा करावी, अशा मागण्या यामध्ये समाविष्ट होत्या.संपात आणि आंदोलनात मोठ्या प्रमाणावर कामगार, कर्मचारी व शेतकरी सहभागी झाले होते. यामुळे परिसरात दिवसभर तणावपूर्ण वातावरण होते.

## देशव्यापी संपाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### कामगार संघटनांची सरकारविरोधात घोषणाबाजी

**पणजी, गोवा । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कामगारविरोधी आणि शेतकरीविरोधी धोरणांच्या विरोधात ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (AITUC) च्या नेतृत्वाखाली गोव्यातील विविध कामगार संघटनांनी आज पणजीतील आझाद मैदानावर मोठ्या प्रमाणात आंदोलन केले. देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या आंदोलनात महिलांचा विशेषतः मोठा सहभाग होता.




कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलकांनी हातात झेंडे, फलक घेत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध केला. यावेळी करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या होत्या, चार श्रम संहितांचा (Labour Codes) रद्दबातल करावे. गोवा अत्यावश्यक सेवा आणि देखभाल अधिनियम (ESMA) मागे घ्यावा. राष्ट्रीय किमान वेतन ₹२६,०००/- महिना लागू करावे. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण थांबवावे. अंतर्गत २०० दिवसांची हमी कामे व रोज ₹६००/- मजुरी द्यावी. जीवनावश्यक वस्तू व इंधन दरवाढ रोखावी. बोनस, भविष्यनिर्वाह निधी आणि निवृत्तीवेतन यामध्ये सुधारणा करावी. सातवा वेतन आयोग लागू करावा. करार (कंत्राटी) कामगारांना कायम कामगाराचा दर्जा व समान वेतन द्यावे. शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (MSP) कायदेशीर हमीसह द्यावी. त्याचबरोबर इतर महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या त्या अशा, कर्जमाफी आणि स्वस्त कर्जे उपलब्ध करावे. सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा योजना राबवावी. सार्वजनिक आरोग्य, शिक्षण आणि वृद्धांसाठी निवृत्तीवेतन ₹१०,०००/- करावे. गोव्यातील खाण कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावे. निसर्गसंपत्तीचे जतन करावे आणि खाजगीकरण थांबवणे. आंदोलनाचे नेतृत्व AITUC चे गोवा राज्य सचिव ख्रिस्तोफर फोन्सेका यांनी केले. त्यांनी सांगितले, केंद्र सरकारचा धोरणात्मक कल कॉर्पोरेटधार्जिणा असून, कामगार, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताविरोधात आहे. हा लढा सत्ताधाऱ्यांच्या अन्यायकारक धोरणांना विरोध करण्यासाठी आहे. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने आंदोलनाची ऊर्जा दुपटीने वाढली. अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, बस चालक, स्थानिक व्यापारी अशा सर्व स्तरांतील लोकांनी आंदोलनात सहभाग घेतला. हे आंदोलन केंद्रातील भाजप सरकारच्या कामगारविरोधी धोरणांप्रती वाढत्या असंतोषाचे प्रतीक मानले जात आहे. वाढती महागाई, वेतनवाढीचा अभाव, रोजगार अभाव आणि खासगीकरणाच्या धोरणांना विरोध करण्यासाठी हे देशव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे.

## परी महाडिकचे सुवर्णयश; रोहाच्या कन्येची झळाळती कामगिरी

**रायगड । गुरुदत्त वाकदेकर**

जिल्ह्यातील रोहा शहरातील कु. परी रुपेश महाडिक हिने नेपाळमधील काठमांडू येथे पार पडलेल्या पहिल्या एशियन मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव उज्वल केले. परी ही डॉ. गोविंद राजे इंग्लिश मिडियम स्कूल, रोहा येथील इयत्ता सहावीतील विद्यार्थीनी असून ती गरीब व मध्यमवर्गीय पार्श्वभूमीतून येते. तिचे वडील एका खासगी कंपनीत काम करत असून आई गृहिणी आहे. तिची मोठी बहीण दहावीत शिक्षण घेत आहे. चार सदस्यांच्या कुटुंबातून येऊन परीने जिद्द, चिकाटी व सातत्याच्या बळावर ही झळाळती कामगिरी गाजवली आहे. ती खऱ्या अर्थाने उगवती आणि प्रेरणादायी खेळाडू ठरली आहे. परीने यापूर्वीही विविध स्तरांवरील स्पर्धांमध्ये सातत्याने यश मिळवले आहे. ठाणे येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत, माणगावच्या जिल्हास्तरीय, धाटावच्या तालुकास्तरीय, दिल्लीतील राष्ट्रीय स्पर्धांमध्ये आणि आता नेपाळमधील आशियाई स्तरावरील स्पर्धेत तिने सुवर्णपदके पटकावली आहेत. तिच्या भरीव कामगिरीची



दखल घेऊन इंग्लंडमध्ये होणाऱ्या जागतिक मिक्स बॉक्सिंग स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे, ही गोष्ट रोहावासीयांसह सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. या सुवर्ण विजयानंतर अखिल भारतीय मराठा महासंघ, रोहा शहर महिला विभागाच्यावतीने कु. परी महाडिक हिचा तिच्या घरी जाऊन सत्कार करण्यात आला. महिला अध्यक्षा दीपा भिलारे, सरचिटणीस अश्विनी पार्टी आणि महिला संघटक प्रिया साळुंके यांनी परीचे मन:पूर्वक अभिनंदन करत तिच्या इंग्लंडमधील आंतरराष्ट्रीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## तुकडेबंदी कायद्यात बदल; एक गुंठ्यापर्यंतच्या जमिनींच्या व्यवहारांना मान्यता ?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील जमिनी तुकडेबंदी कायदा रद्द करण्याची महसूलमंत्री बावनकुळे यांनी घोषणा केली. राज्यातील महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४७ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाणापासून २०० मीटर परिसर आणि विविध प्राधिकरण क्षेत्रांतील जमिनीचे तुकडे मान्य केले जातील. एक गुंठेपर्यंतच्या जमीन व्यवहारांसाठी तुकडेबंदी कायदा रद्द होईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. त्याचबरोबर पुणे वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विशेष बैठक घेण्यात आली. पुणे रिंग रोड डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे समजते. पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक लोकप्रतिनिधींची विशेष बैठक घेण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. पुणे रिंग रोड प्रकल्पातील नऊ पॅकेजेसपैकी ९० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण केला जाईल.



## आझाद मैदानावर शिक्षकांच्या मागण्यांसाठी पवारांचा पाठिंबा

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव अनुदान मिळावे या मागणीसाठी शिक्षक समन्वयक संघाने आझाद मैदानावर आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार सहभागी झाले. त्यांनी आंदोलक शिक्षकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला. यावेळी बोलताना पवार म्हणाले, ''शिक्षक हे समाजाच्या घडामोडींचे शिल्पकार आहेत. त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे राज्यकर्त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. शिक्षकांना टप्प्याटप्प्याने नव्हे तर सन्मानपूर्वक पूर्ण वेतन मिळाले पाहिजे.'' ते पुढे म्हणाले, ''१९८०-८१ मध्ये असाच संघर्ष झाला होता आणि तेव्हा माझ्या नेतृत्वाखाली त्यावर तोडगा निघाला. त्याच पद्धतीने आजही राज्य सरकारने ठोस निर्णय घ्यायला हवा. शिक्षकांना संघर्ष करायला लावणे हे महाराष्ट्राला शोभणारे नाही.'' पवार यांनी स्पष्ट केले की, राज्य शासनाने २४ ऑक्टोबर रोजी जो आदेश काढला आहे, तो केवळ कागदापुरता मर्यादित न ठेवता त्याची अंमलबजावणी करावी आणि आवश्यक तेवढ्या निधीची तरतूद तातडीने करावी. या आंदोलनासाठी पारनेरचे आमदार निलेश लंके, कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनीही शरद पवार यांना आवाहन केले होते. त्यांच्यासह पवारांनी आंदोलकांना आश्वासन दिले की त्यांच्या मागण्यांसाठी ते स्वतः मुख्यमंत्र्यांकडे आग्रही भूमिका घेतील. ''महाराष्ट्रातील शिक्षकांचा सन्मान राखला जाईल आणि त्यांची योग्य ती मागणी मान्य केली जाईल,'' असे आश्वासन देऊन पवारांनी आपले भाषण संपवले.

## भरपावसात अंत्यविधी; शहापूर स्मशानभूमीतील कामे रखडली

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगाव शहरातील विकासकामांचे हाल नागरिकांना वारंवार त्रासदायक ठरत आहेत. आठ वर्षांपूर्वी सुरू झालेली स्मार्ट सिटीतील कामे अद्यापही अपूर्ण असून, शहरातील अनेक भागातील प्रलंबित कामांमुळे नागरिकांचे हाल होत आहेत. शहापूर स्मशानभूमीतील निवाऱ्याचे अपूर्ण काम त्याचेच एक ज्वलंत उदाहरण ठरत आहे.



गेल्या महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहापूर स्मशानभूमीतील निवाऱ्यांवरील पत्रे धोकादायक अवस्थेत पोहोचले होते. यामधील एका निवाऱ्याचे काम सुरू करण्यात आले असले तरी ते पूर्ण होण्यासाठी तीन महिन्यांपेक्षा अधिक वेळ लागला आहे. अवघ्या निवाऱ्याचे काम पूर्ण झाले असले तरी शेगडी आणि चौथऱ्याचे काम अद्यापही प्रलंबित आहे. या कामासाठी तब्बल ३१ लाख ७० हजार रुपयांचा निधी मंजूर असून, ठेकेदाराला दीड महिन्यांत काम पूर्ण करण्याची मुदत होती. मात्र काम रखडल्याने नागरिकांना भर पावसात अंत्यविधी उरकण्याची वेळ आली. त्यामुळे नागरिकांमधे संताप दिसून येत आहे. दरम्यान, नव्याने उभारण्यात आलेल्या निवाऱ्याच्याशेजारीअसलेल्या धोकादायक निवाऱ्यावर झाड कोसळल्याने संपूर्ण निवास कोसळला. त्यामुळे एका निवाऱ्याखालील चार शेगड्यांवरच अंत्यविधी केले जात आहेत.

वडगाव स्मशानभूमीत लाकडांचा तुटवडा असल्याने वडगाव परिसरातील नागरिकही शहापूर स्मशानभूमीकडे येत आहेत. सध्या दररोज चार ते सहा अंत्यविधी होतात आणि निवाऱ्याअभावी काहींना पावसात उघड्यावर अंत्यविधी करावा लागत आहे.फ निवाऱ्याचे काम सुरू होण्यासाठी निधी मंजूर झाला असून, महापौर मंगेश पवार यांनी त्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. तरीदेखील प्रत्यक्षात काम सुरू नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. अंत्यविधीसाठी लाकडांची मोठ्या प्रमाणावर गरज भासत असल्याने आर्थिक भारही वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना रक्षा गोळा करण्याचे आवाहनही केले जात आहे.शहरातील अत्यंत संवेदनशील असलेल्या स्मशानभूमीतील विकासकामांना वेळेत पूर्णत्व यावे, कोसळलेल्या जागी नव्याने निवारा उभारण्यात यावा आणि नागरिकांच्या अडचणी दूर कराव्यात अशी जोरदार मागणी होत आहे.




## मद्य दरवाढीविरोधात परमिटरूम व वाईनशॉप चालकांचे आंदोलन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

राज्य सरकारने परमिट रूमवरील मद्य विक्रीवर १० टक्के अतिरिक्त मूल्यवर्धित कर (VAT) लागू केल्याने हॉटेल, परमिट रूम आणि वाईनशॉप चालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही अन्यायकारक करवाढ तात्काळ मागे घ्यावी, अन्यथा जिल्ह्यातील सर्व परमिट रूम चालक आणि मालक रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन छेडतील, असा इशारा श्रीरामपूर तालुका परमिट रूम व वाईनशॉप ओनर्स सोशल असोसिएशनचे अध्यक्ष नाना जोंधळे यांनी दिला. बैठकीत बोलताना जोंधळे म्हणाले की, लाडकी बहिण योजनेसाठी निधी नसल्यामुळे सरकार त्याचा भार आमच्यावर टाकत आहे. ही करवाढ आमच्या उद्योगाला खाईत लोटणारी आहे. राज्यातील मद्य व्यवसाय आधीच आर्थिक संकटात आहे आणि हॉटेल व्यवसायाला कोणतीही सवलत मिळत नाही. करवाढीमुळे ग्राहकांवरही परिणाम झाला आहे. अवैध मद्यविक्री वाढल्यामुळे अधिकृत व्यवसाय धोक्यात आला आहे. वार्षिक उत्पादन शुल्काचा सर्वाधिक बोजा परमिट रूम चालकांवर पडत आहे. त्यामुळे अतिरिक्त रद्द करावा आणि शुल्क रचनेत सुधारणा करावी, अशी मागणी करण्यात आली. जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर सर्व परमिट रूम व्यावसायिक अनिश्चित काळासाठी बार बंद ठेवतील आणि पुढील वर्षी नूतनीकरण करणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला.



## संभाजी महाराज यांची मॉंटे कॅसिनो युद्धस्मारकाला भेट

**वॉर्सा (पोलंड) । प्रतिनिधी**

कोल्हापूरचे छत्रपती युवराज संभाजी महाराज आणि त्यांच्या कुटुंबियांनी काल वॉर्सा येथील मॉंटे कॅसिनो युद्धस्मारकाला भेट देत द्वितीय महायुद्धातील शूरवीर सैनिकांना अभिवादन केले. याविषयी छत्रपती संभाजी महाराज म्हणाले की, ''द्वितीय महायुद्धात अभूतपूर्व शौर्य गाजवलेल्या सैनिकांच्या, विशेषतः मराठा लाइट इन्फंट्रीच्या बलिदानाची साक्ष देणारे हे युद्धस्मारक भारताच्या सैन्यपरंपरेचा गौरवशाली वारसा जपते.'' याठिकाणी उभारण्यात आलेला फलक भारत आणि पोलंडमधील ऐतिहासिक मैत्रीचे प्रतीक असून, ही मैत्री केवळ लष्करी सहकार्यातून नव्हे तर मानवतेच्या मूल्यांतून साकारलेली आहे. युद्धकाळात पोलंडमधून निर्वासित झालेल्या अनेक पोलिश नागरिकांना कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याने वळिवडे गावात आसरा दिला होता. हा सहकार्याचा आणि मानवतेचा धागा आजही टिकून आहे. युवराज संभाजी महाराज व युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती यांनी स्मारकस्थळी पुष्पचक्र अर्पण करत युद्ध, निर्वासन व पुनर्बांधणी या त्रासदायक प्रक्रियेतून गेलेल्या सर्वांचा सन्मान केला. कार्यक्रमाला भारताच्या पोलंडमधील राजदूत मा. नगमा मल्लिक यांचीही उपस्थिती लाभली. या भेटीतून भारत आणि पोलंडमधील दीर्घकालीन मैत्री, सहकार्य आणि मानवतेच्या अधिष्ठानावर उभ्या असलेल्या संबंधांचे पुनः स्मरण करण्यात आले. युवराज संभाजी महाराज पुढे म्हणाले की, ''धोरणे आणि करार हे केवळ संबंधांचे औपचारिक रूप आहेत, पण खरी मैत्री आणि सहकार्य संकटकाळात दाखवलेल्या धैर्य, सहवेदना आणि सद्भावनेतून आकार घेतात. हे स्मारक त्याचे जिवंत उदाहरण आहे.''

## कोकण मराठी परिषदेच्या अध्यक्षपदी प्रा. महाले, चित्रा क्षीरसागर यांची कार्यवाहपदी फेरनिवड



**पणजी । प्रतिनिधी**

कोकण मराठी परिषद गोवा या संस्थेच्या अध्यक्षपदी प्रा. नारायण महाले यांची एकमताने निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष सागर जावडेकर आणि सचिव चित्रा प्रकाश क्षीरसागर यांनी महाले यांचे नाव सुचवले असता, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. रमाकांत खलप यांनी त्यास अनुमोदन दिले. संस्थेच्या सचिवपदी पुन्हा एकदा चित्रा प्रकाश क्षीरसागर यांची फेरनिवड करण्यात आली आहे. यासोबतच नवीन कार्यकारिणीची निवड तीन वर्षांसाठी करण्यात आली. कोकण मराठी परिषदेच्या गोवा शाखेचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून श्रध्दा खलप यांचे नाव सर्वानुमते निश्चित करण्यात आले, तर कोषाध्यक्षपदी रवींद्र पाटील यांची निवड झाली. सहकार्यवाहपदी डॉ. बिभीषण सातपुते यांची निवड झाली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून सागर जावडेकर, प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, मंगेश काळे, अजित नार्वेकर, कालिका बापट यांची निवड करण्यात आली. सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी ॲड. रमाकांत खलप, गुरुदास सावळ आणि गुरुदास नाटेकर यांची फेरनिवड करण्यात आली. ही निवड कोकण मराठी परिषदेच्या गोमंतक साहित्य सेवक मंडळात पार पडलेल्या वार्षिक आमसभेत एकमताने करण्यात आली.

# जिल्हाधिकारी कार्यालयावर कर्मचाऱ्यांचा धडक मोर्चा

## कर्मचारीविरोधी धोरणांचा निषेध




**अहमदनगर । प्रतिनिधी**

केंद्रसरकारच्या खासगीकरणाच्या, चार कामगार संहितांच्या आणि कर्मचारीविरोधी धोरणांच्या निषेधार्थ ९ जुलै रोजी देशव्यापी संपाला पाठिंबा देत कामगार संघटना महासंघ, किसान सभा समन्वय समिती, शिक्षक-शिक्षकेतर व सरकारी-निमसरकारी कर्मचारी संघटनांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

महापालिकेसमोरून सुरू झालेल्या मोर्चाची जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार घोषणाबाजीसह सांगता झाली. यावेळी आंदोलकांनी मागील युती सरकारच्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याचा आरोप करत, हा मोर्चा भविष्यातील बेमुदत संपाचा इशारा असल्याचे जाहीर केले. जुनी पेन्शन योजना, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, रिक्त पदांची भरती, महागाई भत्त्यात वाढ, वेतन आयोगाची स्थापना, शिक्षक संच मान्यता रद्द, आणि कर्मचारी संरक्षणासाठी ३५३ कलमात सुधारणा आदी २० मागण्यांचा समावेश असलेली सनद जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आली. या आंदोलनात समन्वय समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, विलास पेद्राम, भाऊसाहेब डमाळे, आप्पासाहेब शिंदे, महेंद्र हिंगे, ॲड. सुधीर टोकेकर, अविनाश घुले, प्रा. सुनील पंडित, अर्शद शेख, महेबूब सय्यद, अशोक सब्बन, भाऊ शिंदे, बन्सी सातपुते, विजय काकडे, पुरुषोत्तम आडेप, अशोक मासाळ, संदिपान कासार, भागवत नवगण, देविदास पाडेकर, अरविंद वाव्हळ, श्रीमती व्हि.डी. नेटके, डी.ए. गजभार, श्रीमती एम.एस. बाचकर, युवराज पाटील, अशोक नरसाळे, सयाजीराव वाव्हळ, सिद्धेश्वर कांबळे, सुधीर भद्रे, भारती न्यालपेल्ली, नंदाताई बांगर यांच्यासह अनेक कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ‘‘मुख्यमंत्री एकनाथ शिंदे असताना जुन्या पेन्शन, शिक्षण, आरोग्य व सेवा विषयक आश्वासनांवर अद्याप कार्यवाही नाही. हे सरकार कर्मचारी, आंदोलक आणि जनतेला दडपण्यासाठी जनसुरक्षा कायद्याचा वापर करीत आहे. त्यामुळे हे आंदोलन ही केवळ सुरुवात आहे,‘‘ असा स्पष्ट इशारा प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात दिला.



# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांना नोकरी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उज्वल भवितव्यासाठीचा विश्वासाचा केंद्रबिंदू ठरलेल्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागाने यशाचा नवा आयाम गाठला आहे. संस्थेच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाच्या माध्यमातून नुकत्याच पार पडलेल्या कॅम्पस मुलाखतींमध्ये विभागातील २० विद्यार्थ्यांची निवड नामांकित मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये करण्यात आली. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी एकूण २८ नामांकित कंपन्यांनी प्लेसमेंट मुलाखती घेतल्या. या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांची योग्यता चाचणी, तांत्रिक मूल्यमापन आणि प्रत्यक्ष मुलाखत अशा टप्प्यांमधून चाचणी घेण्यात आली. या कठीण प्रक्रियेतून निवड झालेल्या २० विद्यार्थ्यांनी उच्च पगाराच्या संधीसह आपले करिअर घडवण्याची सुरुवात केली आहे. या निवडीत प्रचेता भुसा हिची इपिटॉम कॉम्पोनन्ट्स प्रा. लि., नगर, मनिष गोरे याची फ्लेअर्स सोलर पी.व्ही. सिस्टिम्स आणि गणेश आवटे याची लॉरीझ क्नुडसन या आघाडीच्या कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ‘‘महाविद्यालयाने दिलेली संधी, प्राध्यापकांचे सतत मार्गदर्शन, संस्थेचे सहकार्य आणि पालकांचे पाठबळ यामुळेच हे यश शक्य झाले.‘‘ या प्लेसमेंट प्रक्रियेत सहभागी झालेल्या प्रमुख कंपन्यांमध्ये जॉन्सन कंट्रोल्स, फोरेशिया इंडिया प्रा. लि., जारो एज्युकेशन, कॉरीझो, कॉग्नीझंट, कॅपजेमिनी, टीसीएस, हायकुल इलेक्ट्रॉनिक्स, व्हेल्ट्रीक इलेक्ट्रिक व्हेईकल्स, फॉक्स सोल्युशन्स, सुदरलँड ग्लोबल सर्व्हिसेस, सी.जी. पॉवर, हेक्झावेअर टेक्नॉलॉजीज, कोकबन ऑटोमेशन यांचा समावेश होता. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे, डायरेक्टर जनरल (प्रशासन) डॉ. पी. एम. गायकवाड, डायरेक्टर (टेक्निकल) प्रा. सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, विभागप्रमुख डॉ. अजित लावरे, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. सुदर्शन दिवटे, विभाग समन्वयक प्रा. राहुल दरंदले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## छोट्या वारकऱ्यांची दिंडी, नृत्य, फुगडी

# भक्तीमय वातावरणात आनंद विद्यालयाची पंढरीची वारी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

गुलमोहर रोडवरील आनंद विद्यालय शाळेत आषाढी एकादशीनिमित्त दिंडी वारीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा धारण करून गुलमोहर रोडवर प्रतिकात्मक दिंडी काढली.

दिंडीदरम्यान रिंगण करून नृत्य सादर करण्यात आले, ज्याला परिसरातील नागरिकांनी उभे राहून भरभरून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या एक भाग म्हणून आनंदनगर परिसरातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी एकत्र येऊन फुगडी खेळण्याचा आनंद घेतला. कार्यक्रमाची सांगता लापशीच्या गोड प्रसादाने करण्यात आली.

या वेळी संस्थेचे सचिव किसन तरटे, ज्येष्ठ संचालक शरदकुमार झंवर, ज्येष्ठ संचालक विश्वनाथ पोखरकर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रविंद्र अष्टेकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर, तसेच शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भक्तिमय उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तीन महिन्यांचा घनकचरा कर माफ करावा- वारे

**अहमदनगर । विजय मते**

शहरात सध्या निर्माण झालेली घनकचरा संकलनाची स्थिती ही अत्यंत गंभीर बनली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून शहरात कचरा संकलनाचे नियोजन कोलमडले असून, अनेक भागांमध्ये आठवडाभर कचरा उचलला जात नसल्याने नागरिकांना दुर्गंधी, रोगराई आणि अस्वच्छतेला सामोरे जावे लागत आहे.



या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक निखिल वारे यांनी महापालिकेचे सहाय्यक आयुक्त सपना वसावा यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे की, गेल्या तीन महिन्यांचा घनकचरा कर तात्काळ माफ करण्यात यावा. निखिल वारे यांनी सांगितले की, ‘‘शहरातील अहिल्यानगर, सावेडी, भोसलेनगर, नागापूर, रेल्वे स्टेशन परिसर तसेच अनेक निवासी आणि व्यावसायिक भागात कचरा संकलनाची वाहनं अनेक आठवड्यांपासून आलेली नाहीत. नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या तरी प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, जे अत्यंत दुर्दैवी आहे.‘‘ त्यांनी पुढे स्पष्ट केले की, महापालिकेने घनकचरा संकलनाचे कंत्राट ज्या एजन्सीकडे दिले आहे, ती संस्था आपले कर्तव्य पार पाडण्यात पूर्णपणे अपयशी ठरली आहे. त्यामुळे शहरभर दुर्गंधी पसरली असून संपूर्ण नगरचे ‘‘बकालीकरण‘‘ झाले आहे. वर्षानुवर्षे नागरिकांकडून लाखो रुपयांचा घनकचरा कर वसूल केला जात असताना देखील, त्याच्या मोबदल्यात आवश्यक सेवा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढीग साचले असून, स्वच्छतेच्या दृष्टीने महापालिकेची कार्यपद्धती अपुरी ठरत आहे. एकीकडे कोट्यवधी रुपये खर्चून रस्ते बनवले जात असतानाच, दुसरीकडे कचरा व्यवस्थापन कोलमडल्याने हेच रस्ते पुन्हा अस्वच्छतेने भरले जात आहेत. वारे यांनी स्पष्टपणे सांगितले की, ‘‘सेवा नसेल, तर कर नको, हे साधे तत्व महापालिकेने पाळावे. सेवा दिलीच नाही, तर कर वसूल करणे अन्यायकारक ठरते.‘‘ त्यांनी महापालिकेकडे पुढील चार प्रमुख मागण्या ठामपणे मांडल्या आहेत: गेल्या तीन महिन्यांचा घनकचरा कर तात्काळ माफ करावा. ज्या भागांमध्ये नियमितपणे कचरा उचल झाला नाही, त्या भागांसाठी विशेष स्वच्छता मोहीम राबवावी. कचरा संकलन पूर्णपणे सुरळीत होईपर्यंत कोणत्याही नागरिकाकडून कर वसूल करू नये. कंत्राटी एजन्सीवर दंडात्मक कारवाई करून नवीन आणि जबाबदार एजन्सीची नेमणूक करावी. ‘‘स्वच्छ भारत, सुंदर नगर ही संकल्पना केवळ बॅनरवर न राहता, ती प्रत्यक्षात उतरली पाहिजे. नागरिकांचे आरोग्य, सन्मान आणि पैसा या तिन्ही बाबींचा विचार करून प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावा, अन्यथा निर्माण होणाऱ्या जनक्षोभावर संपूर्ण जबाबदारी महापालिकेची असेल,‘‘ असा स्पष्ट इशाराही वारे यांनी यावेळी दिला.

# प्रकाश नेत्रालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर

**अहमदनगर । समीर मन्यार**



येथील प्रकाश नेत्रालयात कै. डॉ. प्रकाश चिटगोपेकर तसेच कु. आरती चिटगोपेकर यांच्या २७ व्या स्मृतिदिन व गुरुपौर्णिमा निमित्त गुरुवार, ता. १० जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये डोळ्यांची सविस्तर तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येणार आहेत. यासोबतच नेत्र शस्त्रक्रिया व लेसिक उपचार पद्धतीवर खास सवलतीही देण्यात येणार असल्याची माहिती डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी दिली. प्रकाश नेत्रालयाच्या वतीने सामाजिक बांधिलकीतून अनेक उपक्रम राबवले जातात. आतापर्यंतच्या नेत्र शिबिरांतून अनेक रुग्णांना मोठा फायदा झाला आहे. आपल्या वडिलांना गुरुदक्षिणा म्हणून सर्वसामान्य रुग्णांसाठी उपयुक्त ठरेल, असा सामाजिक उपक्रम राबवण्याचा उद्देश असल्याचे डॉ. चिटगोपेकर यांनी सांगितले. या शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा आणि वेळेत नेत्र तपासणी करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले आहे. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संपर्क: प्रकाश नेत्रालय, पहिला मजला, बँकेच्या वर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मोबाईल: ९४२०४६१११७.


**विशेष सूचना :**

**रविवार, १३ जुलै २०२५ रोजी दुपारी ३.२० वाजता टीव्ही नाईन या वृत्तवाहिनीवरील ‘‘आरोग्यम् धनसंपदाया‘‘ या कार्यक्रमात चाळीशीनंतरचा चष्मा घालवणे या विषयावर डॉ. राजीव चिटगोपेकर यांचे मार्गदर्शन प्रसारित होणार आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.**

# परंपरेचा उत्सव : पद्मशाली समाजाचा बागुलपंडुगू सण ११ जुलैला

**अहमदनगर । प्रतिनिधी**

माणुसकी, निसर्ग आणि परंपरेचे संगम असलेला बागुलपंडुगू सण पद्मशाली समाजामध्ये भक्तिभावाने साजरा केला जातो. रोगप्रतिकारक शक्ती वाढावी आणि समाजामध्ये सलोखा निर्माण व्हावा, या उद्देशाने साजऱ्या होणाऱ्या या सणात निसर्ग देवतेची पूजा करण्याची जुनी परंपरा आजही टिकून आहे. पद्मशाली समाजाचा अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेला वैशिष्ट्यपूर्ण बागुलपंडुगू सण येत्या शुक्रवारी, दि. ११ जुलै रोजी भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा होणार आहे. या संदर्भात माहिती देताना पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा स्वाती सिरसुल यांनी सांगितले की, आषाढ महिन्याच्या पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या शुक्रवारी हा सण साजरा करण्याची पारंपरिक प्रथा आहे. पावसाळ्यामुळे बदलणाऱ्या हवामानामुळे होणाऱ्या संसर्गजन्य रोगांपासून मानवजातीला मुक्तता मिळावी, यासाठी या सणामध्ये निसर्गातील देवदेवतांची पूजाअर्चा केली जाते. विशेषतः शीतळा देवी (पोशम्मा तल्ली) व लक्ष्मी आई (लक्ष्मम्मा तल्ली) यांच्या मिरवणुकीनंतर पुजन केले जाते. कालांतराने जंगलांची कमी झाल्यामुळे आता बहुतांश लोक हा सण घराघरांतच साजरा करतात.




अहिल्यानगरमधील तोफखाना भागातील मोचीगल्ली येथील शीतळा आई देवीच्या मंदिरात सकाळपासूनच भक्तगण मोठ्या श्रद्धेने अभिषेक, नैवेद्य व पूजा करतात. त्यानंतर बालिकाश्रमजवळील जाधव मळा येथील लक्ष्मी आईच्या मंदिरात सहवाद्य मिरवणुकीने जाऊन विधिवत पूजा केली जाते. या सणाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रात फक्त अहिल्यानगरमध्येच हा सण पौर्णिमेनंतरच्या शुक्रवारी साजरा करण्याची परंपरा आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील पद्मशाली समाजात हा सण ‘पोशम्मा पडुंगा’ म्हणून ओळखला जातो व महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, सोलापूर, जालना आदी ठिकाणीही साजरा केला जातो. मात्र अहिल्यानगरमध्ये ही विशिष्ट परंपरा कधीपासून सुरू आहे याची निश्चित माहिती उपलब्ध नाही, असे जुने जाणते पुरोहित विश्वनाथ बोडखे यांनी सांगितले. अहिल्यानगरच्या तोफखाना, बागडपट्टी, पापय्या गल्ली, रंगार गल्ली, झारेकर गल्ली, माळीवाडा, दातरंगे मळा, बालिकाश्रम रोड, श्रमिक नगर, पद्मा नगर, नित्यसेवा सोसायटी आणि उपनगरातील इतर भागांमध्ये राहणारा पद्मशाली समाज या सणात मोठ्या उत्साहाने सहभागी होतो. या बागुलापडुंगू सणानिमित्त पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा स्वाती सिरसुल, महिला बचत गटाच्या अध्यक्षा सुनीता कुरापट्टी, माजी अध्यक्षा श्यामला बोरा, तसेच रंजना क्यादर, लता पुलगम, शारदा सुंकी, विजया बोडखे, रुक्मिणी संदुपटला, भारती सुरम, अंबिका बोगा, ज्योती बिज्जा, पद्मा म्याना आदी महिला कार्यकर्त्यांनी समाज बांधवांना सणाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

रयत समाचार **Classified** छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणाविरोधात मोर्चा

## आयटक, किसान सभा, आशा व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सहभाग

**शेवगाव । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या कार्पोरेट धार्जिण्या व कामगार, कर्मचारी, शेतकरी विरोधी धोरणांच्या निषेधार्थ ९ जुलै २०२५ रोजी आयटक, देशव्यापी कामगार संघटना आणि अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पुकारण्यात आलेल्या संपाला शेवगाव (अहिल्यानगर जिल्हा) येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेवगाव येथील पंचायत समितीपासून निघालेल्या मोर्चामध्ये आशा कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, किसान सभेचे कार्यकर्ते व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जोरदार घोषणाबाजी करत हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. या आंदोलनादरम्यान केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा देत तहसीलदार आकाश दहाडदे यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या होत्या केंद्र सरकारने रद्द केलेले पारंपरिक कामगार कायदे पुन्हा लागू करावेत, नव्याने आणलेल्या चार कामगार श्रम संहितांना त्वरित रद्द करावे, महाराष्ट्र सरकारने जनविरोधी जनसुरक्षा विधेयक मागे घ्यावे, सर्व असंघटित कामगारांसाठी किमान तीस हजार रुपये मासिक वेतन निश्चित करावे व त्याची अंमलबजावणी करावी, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, आणि शेतीमालास उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव द्यावा. या आंदोलनात विविध संघटनांचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. कॉ. सुभाष लांडे, कॉ. भगवानराव गायकवाड, कॉ. संदीप इथापे, कॉ. बबनराव पवार, कॉ. बापूराव राशिनकर, गोरख काकडे, भीवा घोरपडे, रामभाऊ लांडे, विष्णू गोरे, ॲड. भागचंद्र उकिरडे, ॲड. गणेश ताठे यांच्यासह आशा कर्मचारी संघटनेच्या अंजली भुजबळ, वैशाली देशमुख, रत्ना क्षीरसागर, गीता थोरवे, सुमित्रा महाजन, मंगल कोल्हे, आशा मगर, सुशीला गंगावणे, मंगल आहेर, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे एकनाथराव वखरे, सुधाकर निळ, रामेश्वर लबडे, रमेश वाघमारे, लक्ष्मण ठोंबरे, अब्दुलभाई शेख उपस्थित होते. या वेळी बोलताना कॉ. सुभाष लांडे यांनी सांगितले की, ''हे सरकार कामगार आणि शेतकऱ्यांच्या विरोधात असून, मुठभर भांडवलदारांच्या फायद्यासाठी कामगार कायदे रद्द करून हुकूमशाही पद्धतीने चार नव्या श्रम संहिता लागू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कामगारांचे मूलभूत हक्क डावलले जात आहेत.''



# आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष: विविध उपक्रमांनी सहकार सप्ताह साजरा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनिमित्त राज्यभरात सहकार विभागात सहकार सप्ताह २०२५ दिनांक १ ते ६ जुलै या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानुसार श्रीगोंदा तालुक्यात सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या पुढाकाराने विविध शासकीय यंत्रणा, सहकारी संस्था व पतसंस्था यांच्या सहकार्याने दिनांक २ ते ४ जुलैदरम्यान उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सहाय्यक निबंधक नारायण परजणे यांच्या मार्गदर्शनाखाली २ जुलै रोजी तालुक्यातील विविध संस्थांच्या प्रतिनिधींची सभा घेऊन सभासद वाढ मोहिमेवर चर्चा करण्यात आली. यावेळी संस्थांच्या भविष्यातील कार्यपद्धतीवर मार्गदर्शनही देण्यात आले. ३ जुलै रोजी सकाळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थांचे पदाधिकारी, संचालक आणि कर्मचारी उपस्थित होते. त्याच दिवशी दुपारी श्रीमंत राजमाता विजयराजे शिंदे कन्या विद्यालयात चित्रकला व रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. सहभागी विद्यार्थिनींना नारायण परजणे यांच्या हस्ते पारितोषिके व वही भेट देऊन गौरविण्यात आले. मुख्याध्यापिका भोईटे व शिक्षकवृंदांचे विशेष सहकार्य लाभले. त्यानंतर ४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सहकार जनजागृती दिंडी सहाय्यक निबंधक कार्यालयापासून प्रारंभ होऊन श्रीगोंदा शहरातून टाळ-मृदंग व सहकार गीतांच्या गजरात काढण्यात आली. दिंडीत कार्यकारी सेवा संस्था, पतसंस्था व इतर संस्थांचे पदाधिकारी, सचिव, मॅनेजर आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. समारोप प्रसंगी सहकार ध्वजरोहण करून सर्व सहभागी सदस्यांना अल्पोपहार देण्यात आला. दुपारच्या सत्रात पतसंस्था व कार्यकारी संस्थांच्या सचिवांसाठी ई-ऑडिट व संगणकीकरण विषयक मार्गदर्शन सत्र झाले. यामध्ये नारायण परजणे यांनी तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले तर प्रशिक्षण केंद्राचे साखरे यांनी सहकार तत्त्वांवर भाष्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी भाऊसाहेब सिनारे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी नारायण परजणे, भाऊसाहेब सिनारे, सुनील शेलुकर, निलेशकुमार मुंढे, सतीश औरंगे, अलका भवर, अमृता भोसले, तालुका विकास अधिकारी व्यवहारे, बँकेचे कर्मचारी, तालुका लेखापरीक्षक महेंद्र घोडके, तालुका सचिव दत्तात्रय खळदकर आणि पतसंस्था फेडरेशनचे गणेश डोईफोडे तसेच सर्व सचिव मंडळ यांनी मोलाचे योगदान दिले.

# दिगंबर भुजबळ यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



या सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ हा सन्मान दिगंबर गोरख भुजबळ (जि.प. प्राथमिक शाळा, पेडगाव जुने, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांना प्रदान करण्यात आला. हा भव्य सन्मान सोहळा रविवार, ता. २९ जून २०२५ रोजी शिर्डी येथील साई दरबारी येथे पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून राज्य आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपट पवार उपस्थित होते. त्यांच्या हस्ते महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ३६ शिक्षकांना पुरस्कार देण्यात आले. यासोबतच २० अतिरिक्त शिक्षकांनाही शाल आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. दिगंबर भुजबळ यांची ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची पेरणी आणि तंत्रज्ञानाच्या वापराने अध्यापन प्रभावी बनवण्यासाठी विशेष ओळख आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना गिफ्ट, शाल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार सोहळा नगर-मनमाड रोडवरील, साई पालखी निवारा, निघोज, शिर्डी येथे अत्यंत दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. या प्रसंगी शिक्षक, नातेवाईक, मित्रमंडळी, व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व. ऋतुजा राजगे आत्महत्या प्रकरणात चौकशी व्हावी

## आमदार पडळकरांवर गुन्हा दाखल करा;सकल ख्रिस्ती समाजाची मागणी



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

सांगली जिल्ह्यातील कुपवाड येथे ६ जून २०२५ रोजी घडलेल्या स्व. ऋतुजा राजगे आत्महत्या प्रकरणाची चौकशी व्हावी आणि संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल ख्रिस्ती समाज, शेवगाव तालुका यांच्यातर्फे तहसीलदार शेवगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आत्महत्येचा संदर्भ ख्रिस्ती धर्म व धर्मगुरूंशी जोडून काही व्यक्तींनी समाजात तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषतः आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिस्ती धर्मगुरूंविषयी केलेले वक्तव्य अत्यंत भडकाऊ व असहिष्णुतेला खतपाणी घालणारे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, आमदार पडळकर यांनी जाहीरपणे, ''जो ख्रिस्ती धर्मगुरू गावात येईल, त्याचा सैराट पद्धतीने खून करणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस दिले जाईल,'' असे विधान करून ख्रिस्ती धर्मगुरूंच्या सुरक्षिततेला आणि धार्मिक स्वातंत्र्याला मोठा धोका निर्माण केला आहे. यामुळे ख्रिस्ती समाजात भीतीचे वातावरण पसरले असून, भारतीय संविधान आणि कायद्यानुसार हे विधान अत्यंत निषेधार्ह आहे. त्यामुळे आमदार पडळकरांवर तत्काळ गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच, ख्रिस्ती धर्मगुरूंना पोलिस संरक्षण द्यावे, धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या वक्तव्यांवर निर्बंध आणावेत, आणि शांतताप्रिय ख्रिस्ती समाजाची बदनामी थांबवण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक कारवाई करावी, अशीही जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. या निवेदनावर फादर सुभाष त्रिभुवन, रेव्हरंड जगदिश चक्रानारायण, पास्टर अमोल पवार, रेव्हरंड संदीप मगर, मेजर बनकर, देवानंद गायकवाड, शिमोन पहिलवान, फेलोशिप शेवगाव तालुका, सिस्टर उज्वला, सिस्टर ज्युली, सतीश मगर, अविनाश मगरे, राजेंद्र मगर, अजय मगर, कडूबा मगर, मनोज मगर, स्वप्निल मगर, आकाश गायकवाड, सुनील आहुजा, सिद्धार्थ लहासे, अनिल इंगळे, प्रतिभा बनसोडे, वैशाली मोहिते, मंगल मगर आणि शैला मगर यांच्यासह अनेक ख्रिस्ती समाजबांधवांनी स्वाक्षऱ्या केल्या असून, यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# सिराजुन्निसा पठाण यांचे निधन

**श्रीरामपूर । सलीम खान पठाण**



नगरपालिका शिक्षण मंडळातील मराठी शाळेच्या सेवानिवृत्त शिक्षिका,शिक्षक बँकेचे शाखाधिकारी फयाज पठाण तसेच सामाजिक कार्यकर्ते नियाज पठाण यांच्या मातोश्री सिराजुनिसा गफूर खान पठाण उर्फ सि.ग.पठाण यांचे काल दुपारी ३.३० वा.आकस्मिक निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होत्या.एक विद्यार्थी प्रिय शिक्षिका म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रात्री श्रीरामपूर येथील कब्रस्तानात त्यांचा दफन विधी पार पडला.

# आनंदराव काटे पाटील यांचे निधन

**पाथर्डी । राजेंद्र देवढे**



तालुक्यातील मोहोज देवढे येथील रहिवाशी आनंदराव भागुजी काटे पाटील यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय सुमारे ८० वर्षे होते. राकट व्यक्तिमत्व लाभलेल्या आनंदराव यांची स्वकष्टार्जित साधनसंपत्ती नवीन पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी प्रपंच सावरला. कर्मावर निष्ठा व ध्येयवाद असला तर परिस्थितीला शरण आणता येते, हे त्यांनी त्यांच्या जीवनप्रवासात सिद्ध करुन दाखवले. त्यांच्या पाठीमागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

आयुष्याच्या प्रत्येक वळणाला मोठ्या हिमतीने सामोरे गेलेल्या आनंदराव यांना आदराने आण्णा या नावाने संबोधले जात होते. त्यांच्या निधनाने गावात पोकळी निर्माण झाली आहे.

# दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचे वाटप



**पाथर्डी । प्रतिनिधी**

आपल्या सभोवताली असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना अत्याधुनिक संशोधनाचा लाभ मिळावा, यासाठी केंद्र व राज्य सरकार तसेच आरोग्य विभागाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहेत. सरकारसह समाजातील प्रत्येक घटकाने दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान दराडे यांनी केले.

शहरातील जिल्हा रुग्णालयात डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर, उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी, भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम एलिम्को (कानपूर), व एस.आर. ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पाथर्डी तालुक्यातील दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या सुरुवातीला डॉ. हेलेन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. भगवान दराडे यांच्यासह डॉ. रुपेश जाधव (संचालक, एस.आर. ट्रस्ट), यश चुंबळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, माजी नगरसेवक बंडू बोरूडे, प्रहार संघटनेचे हुमायून आतार, अशोक खेडकर, मतिमंद बालगृहाचे मुख्याध्यापक सचिन तरवडे, तसेच दिव्यांग बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात पीएमडीके (PMDK) योजनेअंतर्गत जयपूर फूट, कुबड्या, साधी काठी, वॉकर, श्रवणयंत्र, अंधासाठी काठी, ब्रेल किट, विशेष प्रकारचे बूट आदी साहित्यांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अतुल धुमाळ, अतुल ससे, मुस्तफा शेख, प्रदीप धुमाळ, गौतम बळीद, गौरव खताळ, धोंडीबा नवघरे, किरण चिंतामणी, दिनेश गरड, प्रवीण बळीद, भारत बर्डे, संदीप भोंगळे, केतन पाचरणे, बापूसाहेब गायकवाड आदींनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिनाथ शिरसाठ यांनी केले. सूत्रसंचालन आप्पासाहेब गायकवाड तर आभार प्रदर्शन नितेश मेघनर यांनी मानले.

# पुरवठा विभागात अनागोंदी; सावली दिव्यांग संघटनेचा इशारा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**



शेवगाव तालुक्यातील पुरवठा विभागाच्या दिरंगाई, दुर्लक्ष व हलगर्जी कारभाराविरोधात सावली दिव्यांग संघटना आणि विविध सामाजिक संघटनांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, येत्या २२ जुलै २०२५ पासून तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन नायब तहसीलदार बकरे यांच्याकडे सादर करण्यात आले. दिव्यांग नागरिकांसह सर्वसामान्य लोकांना पुरवठा विभागातून होणाऱ्या त्रासाला कंटाळून ही आंदोलनाची भूमिका घेण्यात आली आहे. नवीन रेशनकार्डसाठी ऑनलाईन अर्ज मंजुरीस विलंब होत असून, नायब तहसीलदार यांची डिजिटल सही (थंब) वेळेवर न झाल्यामुळे हजारो अर्ज दरमहा होत असल्याचा आरोप संघटनेने केला. परिणामी, गरजूंना अत्यावश्यक धान्यापासून वंचित राहावे लागत आहे. संघटनेने मागणी केली आहे की, ही डिजिटल सही दर १० दिवसांनी नियमितपणे व्हावी आणि ही प्रक्रिया तत्काळ सुरू करण्यात यावी. कार्यालयातील संगणकीय कर्मचाऱ्यांची गैरहजेरी आणि कामकाजातील हलगर्जीपणावरही संघटनेने जोरदार आक्षेप घेतला आहे. ऑनलाईन कामासाठी नेमण्यात आलेले कोतवाल धुराजी म्हस्के व जयराम जाधव यांना संगणकीय कौशल्य नसतानाही जबाबदारी देण्यात आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हे कर्मचारी कार्यालयीन वेळेत मोबाईलवर गेम खेळणे, सोशल मीडियावर वेळ घालवणे यामध्ये व्यस्त असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. मार्च २०२५ पासून पोस्टाद्वारे पाठवलेले अर्ज नाव समावेश, नाव वगळणे, धान्य सुरू करणे इ. अजूनही प्रलंबित असून, ही कामे एकाच दिवसात मार्गी लावावीत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. पुढे, सर्व अर्ज फक्त अधिकृत टपालाद्वारेच स्वीकारण्यात यावेत, अशी मागणीही संघटनेने केली आहे. दिव्यांग बांधवांना होणाऱ्या अडचणी टाळण्यासाठी तहसील कार्यालयाचे कामकाज तळमजल्यावर हलवावे, संगणकीय सुविधा सुसज्ज कराव्यात, तसेच कॅमेरे आवाजासह बसवावेत, अशी सूचनाही देण्यात आली आहे. रेशनकार्डशी संबंधित सेवा पूर्णतः विनाशुल्क असाव्यात आणि १२ अंकी ऑनलाइन प्रिंट देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली.अंत्योदय योजनेअंतर्गत दिव्यांग, विधवा, घटस्फोटित, परितक्त्या महिला व अनाथ कुटुंबांनाही रेशनचा लाभ मिळावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.निवेदन देताना सावली दिव्यांग संघटनेचे तालुका अध्यक्ष चांद शेख, संघटक अनिल विघ्ने, आरपीआय महिला आघाडीच्या आशाताई पवार, अनिल मुंढे, तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# गुरु पौर्णिमा

आज गुरुपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणजे गुरूंच्याप्रति लिन होण्याचा आणि गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. आषाढ महिन्यांत गुरु पौर्णिमा साजरी केली जाते. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतो. या दिवशी गुरुतत्व एक हजार एक हजार पटीने कार्यरत असते त्यासाठी शिष्य यादिवशी अखंड आपल्या गुरुसेवेत मग्न असतो. गुरू शिष्य नाते हे असे एक नाते आहे की ज्याला मर्यादा नाही. अखंड साधनेत कार्यमग्न असणे, गुरूंनी दिलेले नाम घेणे, गुरूंचा महिमा गाणे, प्रसंगी प्राणाचीही पर्वा न करता गुरू कार्य करणे, असं अतूट नातं म्हणजे गुरू शिष्याचं नातं. गुरू शिष्य परंपरा हे आपल्या भारत देशाचं एक वैशिष्ट्य म्हटलं तरी वावगे ठरणार नाही. आपल्या देशात तर गुरुचे महत्व खुप आहे. गुरूला साक्षात देव मानणारी आपली संस्कृती आहे. म्हणूनच गुरुर ब्रह्मा। गुरुर विष्णू। गुरुर देवो माहेश्वरा। गुरू साक्षात परब्रह्म। तस्मई श्री गुरू देव नमः अशी आपण गुरूंची ओळख करून देतो. गुरू म्हणजे काय ? गुरूंचे महत्व काय? आपल्या जीवनात गुरूंचे असणे म्हणजे काय? या सगळ्या गोष्टींची उत्तरे एका लेखात मिळणे अशक्य आहे यास्तव थोडक्यात सांगायचे म्हणजे आपल्याला देव दाखवता येत नाही, पण गुरूंच्या माध्यमातून आपण देवालाच अनुभवत असतो. देवाने गुरूंच्या माध्यमातून केलेली कृपा अनुभवत असतो. गुरूंची लीला शब्दात मांडणे अशक्य आहे. म्हणून तर आपण दरवर्षी गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी गुरुपौर्णिमा साजरा करतो. गुरू हा संतकुळीचा राजा। गुरू हा प्राण विसावा माझा। गुरुविण देवपूजा पाहत नाही त्रैलोकी। वरील काव्य पंक्तीतून गुरू शब्दाची महती येते. कारण गुरूला आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुच आपल्याला अज्ञानातून बाहेर काढतात. प्रथम आपण गुरु या शब्दाचा अर्थ समजून घेऊया. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे नाहीसे करणारा. गुरू आपल्याला जीवनातील विकारांचे अज्ञान दूर करून आनंदी जीवन कसे जगावे हे शिकवतात आणि प्रकाशाच्या म्हणजेच ज्ञानरुपी योग्य वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. गुरू म्हणजे ज्ञानाचा अखंड झरा आहे. अंधकाराचा नाश करून प्रकाशाचा किरण देणारा गुरू असतो. एकदा का गुरू आपल्या आयुष्यात आले की त्यांची कृपा सतत आपल्यावर होत राहते. गुरूंनी सांगितलेली साधना सतत करणे हीच गुरूंविषयी खरी कृतज्ञता होय. गुरू आपल्यावर निरपेक्ष प्रेम करतात. त्यांना आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा झालेला पाहणे एव्हढेच अपेक्षित आहे. त्यासाठी ते आपल्या आपल्या शिष्यांना उत्तम असे ज्ञान देत असतात. जर उत्तम ज्ञान मिळवून उत्तम व्यक्ती म्हणून समाजात ज्ञान कमवायचे असेल तर जीवनात गुरुंना पर्याय नाही. माणसाच्या जीवनातील पहिले गुरू म्हणजे त्याचे आईवडील.आई ही तर आपल्या जीवनातील प्रथम आद्य गुरू. आई इतकं श्रेष्ठ दैवत या जगात नाही असं समर्थांनी लिहिले आहे. मूल जेंव्हा लहान असते तेंव्हा आईवडीलच त्याच्यावर संस्कार करीत असतात.त्याला छोट्या छोट्या गोष्टीतून जीवनात कसे वागायचे ते शिकवत असतात.आईवडील हेच तर आपले प्रथम गुरू असतात. म्हणून त्यांचा आदर करायला हवा. आईवडीलानंतर नंबर लागतो तो शिक्षकांचा त्यांचीही आपल्या जीवनात खूप महत्वपूर्ण भूमिका असते. मुलांवर योग्य आणि चांगले संस्कार करण्याचे, बाल मनाला पैलू पाडण्याचे काम शिक्षक करीत असतात. मुलांच्या जीवनाला खरा आकार शिक्षकच देत असतात. आईवडील आणि शिक्षकांनी कोऱ्या पाटीवर केलेले संस्कार कायमस्वरूपी टिकून राहतात मग ते चांगले असोत की वाईट. त्याचाच प्रभाव त्या मुलांच्या पुढील आयुष्यात कायम राहतात. आईवडील आणि शिक्षकच नव्हे तर जन्मापासून आपण आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक गोष्टींपासून, व्यक्तींपासून काही ना काही तरी शिकतच असतो. प्रत्येक गोष्ट जी आपल्याला शिकवण देते ती गुरुच असते. उदाहरणार्थ- सूर्य, पृथ्वी, नदी, जल, वारा, अग्नी, झाडे, पाने, फुले, ढग,डोंगर निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काही तरी शिकवत असते. या सर्वांना आपण गुरुस्थानी मानून त्या प्रत्येक पदार्थांविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. त्यांची देण्याची, त्यागाची, परोपकाराची वृत्ती आपण जोपासली पाहिजे. या सर्व गोष्टी जोपासण्यासाठी आपल्याला गुरूंची आवश्यकता असते.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद



# पद्मशाली कायदेशीर सल्लागार समिती गठित

## ॲड. सिरसूल, ॲड. बोडखे व ॲड. मच्चा बिनविरोध निवड

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पद्मशाली पंचकमिटी ज्ञाती समाजाच्या वतीने समाजातील वकिलांची बैठक घेऊन त्रिसदस्यीय कायदेशीर सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली. समितीवर ॲड. व्यंकटेश सिरसूल, ॲड. सुजाता बोडखे आणि ॲड. दिपक मच्चा यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याची माहिती पद्मशाली पंचकमिटीचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी दिली. बैठकीत समाजातील वकिलांनी एकत्र येऊन निर्णय घेतला की समाजातील नागरिकांना सुलभ व मोफत कायदेशीर सल्ला मिळावा. पती-पत्नी व कौटुंबिक वाद निवारणात मदत व्हावी यासाठी या समितीचे गठन करण्यात आले. मार्कंडेय देवस्थानचे अध्यक्ष गणेश विद्ये यांनी समाजबांधिलकीतून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. ही समिती एका वर्षाकरिता कार्यरत राहणार असून, पुढे नवीन समिति नेमली जाणार आहे. या समितीमध्ये इतर सदस्य म्हणून ॲड. देविदास गाली, ॲड. नोटरी मोहन येनगंदूल, ॲड. नोटरी प्रमोद जेटला, ॲड. नोटरी राजू गाली, ॲड. महेश आनंदास, ॲड. गौरी सामलेटी, ॲड. लक्ष्मीछाया रामदिन, ॲड. प्रतीक्षा मंगलराम आणि ॲड. लक्ष्मी लखापती यांची निवड करण्यात आली. तर समितीचे मार्गदर्शक म्हणून ॲड. पांडुरंग बल्लाळ आणि ॲड. दिपक जेटला यांची नेमणूक करण्यात आली. बैठकीत सर्व वकिलांनी सक्रिय सहभाग घेत बिनविरोध निवड केली. निवड झालेल्या सदस्यांनी समाजाच्या हितासाठी निःस्वार्थपणे सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रत्येक आठवड्याच्या शनिवार व रविवारी दोन तास मोफत कायदेशीर सल्ला देण्यात येणार असून, हे मार्गदर्शन मार्कंडेय संकुल येथे होईल, अशी माहिती ज्येष्ठ विश्वस्त ॲड. कुमार आडेप यांनी दिली. बैठकीस पंचकमिटीचे पदाधिकारी तसेच देवस्थानचे ज्ञानेश्वर मंगलारप, अमित बुरा, विनोद बोगा, पुरुषोत्तम बुरा, त्रिलेश येनगंदूल आदी मान्यवर उपस्थित होते.





# श्री मेडिकल अँड जनरल स्टोअर्सचे डॉ.उषाताई तनपुरे यांच्या हस्ते उद्घाटन

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी शहरातील सिद्धार्थ शेळके या तरुण उद्योजकाने 'श्री मेडिकल अँड जनरल स्टोअर्स' या नूतन दालनाचा शुभारंभ केला.

याचे उद्घाटन माजी नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. तनपुरे म्हणाल्या, ग्रामीण भागातील युवक शिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा प्रयत्न करत आहेत हे पाहून आनंद होतो.

नव्या व्यवसायासाठी सिद्धार्थ शेळके यांना मनःपूर्वक शुभेच्छा देते. कार्यक्रमाला रा.ता.स. खरेदी विक्री संघाचे चेअरमन युवराज सुधाकर तनपुरे, ग्रामस्थ आणि व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सिद्धार्थ शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि ग्राहकांना उत्तम सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जितेंद्र आव्हाड राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुख्य राष्ट्रीय प्रवक्तेपदी

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने दोन महत्त्वपूर्ण राष्ट्रीय नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार व राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांच्या मान्यतेने या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांची पक्षाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवक्ते पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे विचार, धोरणे आणि अधिकृत भूमिका देशभरात प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा लाभ पक्षाला होणार आहे. प्रसारमाध्यमांमध्ये पक्षाचे प्रतिनिधित्व अधिक प्रभावीपणे करण्यासाठी आव्हाड हे योग्य नेतृत्व ठरणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले. तसेच, क्लाईड क्रास्टो यांची राष्ट्रीय सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षसंघटन बळकट करण्यासाठी आणि विविध स्तरांवर पक्षाचे विचार जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी क्रास्टो यांचे योगदान मोलाचे ठरेल, असा विश्वास पक्षनेतृत्वाने व्यक्त केला आहे. या दोन्ही नियुक्त्या भविष्यातील राजकीय दिशा स्पष्ट करणाऱ्या असून, पक्षाच्या वाढीसाठी महत्त्वाची ठरणार आहेत. या दोन्ही नेत्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# प्रकाश मुथा यांची नात उन्नती मुथ्था सी.ए. परीक्षेत अव्वल

**बेलापूर । शफीक बागवान**

येथील उन्नती मुथ्था हिने इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या वतीने घेण्यात आलेल्या सी.ए. (सनदी लेखापाल) परीक्षेमध्ये उच्च श्रेणीने यश संपादन केले. तिच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



उन्नती हिने पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण समता स्कूलमध्ये पूर्ण केले असून अकरावी ते वाणिज्य पदवीपर्यंतचे शिक्षण बी.एम.सी.सी. कॉलेज, पुणे येथे घेतले. ती श्रीरामपूर व बेलापूर येथील जैन समाजाचे मार्गदर्शक प्रकाश कन्हैयालाल मुथ्था व विमला मुथ्था यांची नात असून राजेश व सारिका मुथ्था यांची कन्या आहे. सी.ए. परीक्षेच्या तयारीदरम्यान उन्नतीला मुथ्था अँड लाहोटी सी.ए. कंपनीचे तसेच प्रांजल लांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. ती रत्नेश व वंदना यांची पुतणी आणि आमिषा हिची बहीण आहे.उन्नतीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल बेलापूर येथील भाजपा नेते सुनील मुथा, हाजी शफीक बागवान, रणजीत श्रीगोड, भारतीय जैन संघटना, सकल जैन समाज, श्रीरामपूर चातुर्मास व दीक्षा समिती, श्री स्थानकवासी जैन संघ श्रीरामपूर व बेलापूर संघाच्या वतीने तिचे अभिनंदन करण्यात आले.

# ११ जुलैला भव्य रक्तदान शिबिर; मोबाईल व्यावसायिकांचा पुढाकार

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

सामाजिक बांधिलकी जपत मोबाईल क्षेत्राशी संबंधित व्यावसायिकांनी समाजोपयोगी स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. शेवगाव मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने ११ जुलै २०२५, शुक्रवार रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत मारुतीराव घुले पाटील मंगल कार्यालय, शेवगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशन, नगर, तसेच ऑल इंडियन मोबाईल रिटेलर असोसिएशन यांचे सहकार्य लाभले असून, केवळ व्यवसायापुरते मर्यादित न राहता समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग देण्याचा उद्देश या संघटनांचा आहे. शिबिरात प्रशिक्षित वैद्यकीय पथकाच्या उपस्थितीत रक्त संकलन करण्यात येणार असून, रक्तदात्यांची आरोग्य तपासणी, प्रमाणपत्र वितरण व अल्पोपहार यांसह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शेवगाव शहरासह परिसरातील तरुण, युवक संस्था, नागरिक व समाजसेवी संघटनांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. रक्तदात्यांची नोंदणी, शिस्तबद्ध व्यवस्थापन व वैद्यकीय सोयींसह संपूर्ण शिबिराची आखणी करण्यात आली आहे. शेकडो नागरिक रक्तदान करून समाजसेवेत योगदान देतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. या उपक्रमासाठी अहिल्यानगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशन, नगर, तसेच ऑल इंडियन मोबाईल रिटेलर असोसिएशन यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. शिबिराचे आयोजन शुक्रवार, ११ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत मारुतीराव घुले पाटील मंगल कार्यालय, शेवगाव येथे करण्यात आले आहे. शेवगाव मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य व स्वयंसेवक या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेत असून, ''रक्तदान हेच जीवनदान'' ही संकल्पना समाजात रुजवण्यासाठी कार्यरत आहेत. ''रक्तदान करा, जीवनदान द्या समाजासाठी एक सकारात्मक पाऊल उचलूया!''

# सेंट टेरेसा हायस्कूलमध्ये नवनियुक्त कॅप्टन सेरेमनी

## विद्यार्थ्यांनी घेतली शिस्त, सेवा आणि नेतृत्वाची शपथ



**मुंबई । श्याम ठाणेदार**

वांद्रे येथील सेंट टेरेसा हायस्कूलमध्ये नुकतेच नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली असून, २०२५-२६ साठी शाळेच्या स्कूल कौन्सिल टीमची निवड करण्यात आली. दिनांक ८ जुलै २०२५ रोजी शाळेच्या प्रार्थना सभागृहात ''कॅप्टन सेरेमनी'' हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना व दीपप्रज्वलनाने झाली. शाळेच्या शिक्षिका ऑलविडा यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देत स्वागत केले. यानंतर नवीन हेड बॉय, हेड गर्ल आणि हाउस कॅप्टननी सन्मानपूर्वक शपथ घेतली. त्यांनी शाळेच्या शिस्तीचे पालन, सेवा आणि नेतृत्व ही मूल्ये प्रामाणिकपणे जपण्याचा संकल्प केला. याच वेळी सर्व विद्यार्थ्यांनाही शिस्त, निष्ठा आणि सेवाभावाची सामूहिक शपथ देण्यात आली. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून विकास बाबर (महाराष्ट्र पोलीस) उपस्थित होते. आपल्या प्रभावी भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यावर भर दिला. त्यांच्यासोबत सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार काळे व श्री. वाघ यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक फादर शिनॉय मेथ्यु यांनी नव्या टीमचे अभिनंदन करत त्यांना त्यांच्या कर्तव्यासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन शिक्षिका सविना डायस यांनी केले. याप्रसंगी शाळेचे व्यवस्थापक फादर हेन्री, उपमुख्याध्यापिका रोझ लोबो, पर्यवेक्षिका लिंडा अँथनी, ब्रदर अक्षित, सर्व शिक्षक, पालक आणि उपस्थितांनी नव्या टीमसाठी उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाची सुंदर आखणी इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या कमिटीने केली होती.

# कापड बाजारात रस्ते काम ठप्प
# साचलेल्या सांडपाण्यातून नागरिकांची तारेवरची कसरत

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव शहरातील मुख्य कापड बाजारातील रस्ता काम ठेकेदाराकडून गेल्या पंधरा दिवसांपासून उखडून ठेवण्यात आले असून, त्या ठिकाणी काम पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसामुळे या भागात सांडपाणी साचले असून, नागरिकांना गटारसदृश पाण्यातून मार्ग काढत जावे लागत आहे. या भागातून दररोज हजारो नागरिकांची वर्दळ असते. परंतु रस्ता पूर्ण खोदून काम अधुरं टाकण्यात आलं असून, रहदारीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. गाडीस्वारांपासून पादचारी नागरिकांपर्यंत अनेकांना किरकोळ अपघातांचा सामना करावा लागत आहे. ठेकेदाराला कोणाचा वरदहस्त आहे का? असा प्रश्न सामान्य नागरिक उपस्थित करत असून, नगरपरिषद प्रशासन अशा हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई का करत नाही, याबाबत संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासन कोणाच्या दबावाखाली काम करत आहे का, असा संशय नागरिकांमध्ये आहे. स्थानिक रहिवाश्यांनी रस्त्याचे काम तत्काळ पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्याची मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागेल, असा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

